Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**D**

# Paper-III
# EDUCATION

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .........................................

(Name) ................................................

2. (Signature) .........................................

(Name) ................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## APR - 70317

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **32** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 75 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गाचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# EDUCATION
## Paper III
# शिक्षणशास्त्र
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Community participation in universalization of education is achieved under DPEP by constituting .................. .
   (A) Village Education Committee
   (B) Village Human Resource Committee
   (C) Village Mahila Education Centre
   (D) Village Community Education Centre

2. The Right to Education Act was implemented in Maharashtra in the year .................... .
   (A) 1986
   (B) 2002
   (C) 2005
   (D) 2010

1. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामधे समाजाचा सहभाग डी. पी. ई. पी. अंतर्गत स्थापिलेल्या ........................ मुळे प्राप्त झाला आहे.
   (A) ग्राम शिक्षण समिती
   (B) ग्राम मानव संसाधन समिती
   (C) ग्राम महिला शिक्षण केंद्रे
   (D) ग्राम समाज शिक्षण केंद्रे

2. महाराष्ट्रामधे 'शिक्षणाचा अधिकार' हा कायदा .................. या साली कार्यान्वित झाला.
   (A) 1986
   (B) 2002
   (C) 2005
   (D) 2010

3. Distance education system as compared to conventional education system is better equipped in the content of .................... .

(A) Superior teaching

(B) Self-learning

(C) Systematic teaching

(D) Simplified learning

4. The Mid-Day Meal Scheme for Primary Schools was started in the year .................. in Maharashtra.

(A) 1986

(B) 1995

(C) 2002

(D) 2005

3. दूरशिक्षण प्रणाली पारंपरिक शिक्षण प्रणालीपेक्षा ...................... च्या संदर्भात अधिक उपयुक्त आहे.

(A) उत्तम अध्यापन

(B) स्वयं अध्ययन

(C) नियमबद्ध अध्यापन

(D) सुलभ अध्ययन

4. 'मध्यान्हीचे भोजन योजना' प्राथमिक शाळेसाठी ........................... यासाली महाराष्ट्रात सुरू झाली.

(A) 1986

(B) 1995

(C) 2002

(D) 2005

5. One of the major objectives of DPEP was to raise the average achievement level of students at least by .................. .

(A) 40%

(B) 30%

(C) 25%

(D) 10%

6. College accreditation by NAAC is .................. .

(A) Summative evaluation

(B) Formative evaluation

(C) Both summative and formative evaluation

(D) Self-evaluation

7. The decision facilitation curriculum model advocated by Stufflebeam has the following basic components are .................... .

(A) Context — input — process and product

(B) Objectives — input — process and product

(C) Context — objectives — input and product

(D) Context — input — product, placement

5. DPEP चे महत्त्वाचे एक उद्दिष्ट होते की विद्यार्थ्यांची सरासरी संपादन पातळी कमीत कमी .................... ने वाढावी.

(A) 40%

(B) 30%

(C) 25%

(D) 10%

6. NAAC कडून महाविद्यालयाचे मूल्यांकन केले जाते हे .................. आहे.

(A) संकलित मूल्यमापन

(B) विकासात्मक मूल्यमापन

(C) संकलित व विकासात्मक मूल्यमापन

(D) स्वयं मूल्यमापन

7. निर्णय सुलभीकरण अभ्यासक्रम प्रतिमान की जे स्टफलबिम (Stufflebeam) यांनी पुरस्कृत केले आहे, त्याचे घटक पुढीलप्रमाणे आहेत :

(A) संदर्भ—अंतर्गमन—प्रक्रिया व फलित

(B) उद्दिष्टे—अंतर्गमन—प्रक्रिया व फलित

(C) संदर्भ—उद्दिष्टे—अंतर्गमन व फलित

(D) संदर्भ—अंतर्गमन—फलित व पदनिश्चिती

8. Generally graduates from rural background are poor in English because .................. .
   (A) Graduate curriculum does not have sufficient English language component
   (B) Proper teaching methods are not used
   (C) Limited focus in the syllabus on English
   (D) Insufficient learning experiences in colleges

9. In credit base curriculum credit includes :
   (A) Quantum of work to be completed by teacher within given period of time
   (B) Quantum of study to be completed within given period of time
   (C) Frequent conduction of examination within specified time
   (D) Compulsion of deciding merit of students on the basis of grades

8. सामान्यपणे, ग्रामीण पार्श्वभूमी असलेले पदवीधर इंग्रजीमध्ये कच्चे असतात, कारण ............ .
   (A) पदवी अभ्यासक्रमामध्ये इंग्रजीचा आशय पुरेसा नाही
   (B) सुयोग्य अध्यापनपद्धती वापरल्या जात नाहीत
   (C) पाठ्यक्रमामध्ये इंग्रजीवर मर्यादित भर
   (D) महाविद्यालयात पुरेसे अध्ययन अनुभव दिले जात नाहीत

9. श्रेयांकाधारित अभ्यासक्रमामध्ये श्रेयांकात ..................... चा समाविष्ट आहे.
   (A) विहित वेळेत शिक्षकाने ठरावीक काम पूर्ण करणे
   (B) विहित वेळेत विद्यार्थ्यांनी ठरावीक अभ्यास पूर्ण करणे
   (C) निश्चित केलेल्या वेळेमध्ये वारंवार परीक्षा घेणे
   (D) विद्यार्थ्यांचे यश श्रेणीमध्ये ठरविण्याची अनिवार्यता

10. Grass-root approach to curriculum does not agree with .................. .

    (A) Involvement of teachers in development

    (B) Curricular development begins at classroom with teaching learning unit

    (C) To start with specific and evolve to general

    (D) To work with a framework of curriculum provided by higher authority

11. Supervision has gradually moved from the improvement of instruction to the improvement of learning. This definition is given by .................. .

    (A) Harold Spears

    (B) Ronald Campbell

    (C) Kimball Wiles

    (D) Fred Ayer

10. अभ्यासक्रमाचा मूलभूत उपागम हे ............. याच्याशी सहमत नाही.

    (A) विकासामध्ये शिक्षकाचे सामावणे

    (B) अभ्यासक्रम विकसन हे वर्गातील अध्ययन-अध्यापन सुरू होते

    (C) विशेषाकडून सुरुवात करून सामान्यीकरण विकसित करणे

    (D) वरिष्ठांनी ठरवून दिलेल्या अभ्यासक्रम चौकटीपासून कामाला सुरुवात करणे

11. पर्यवेक्षण हे हळूहळू अनुदेशनातील सुधारणेकडून अध्ययनातील सुधारणेकडे गेलेले आहे, ही व्याख्या .................... यांनी दिलेली आहे.

    (A) हेराल्ड स्पेअर

    (B) रोनाल्ड कम्बेल

    (C) किम्बाल विल्स

    (D) फ्रेड अयर

12. From the following .................... is not a feature of corrective supervision.
    (A) Works with a sense of authority
    (B) Believes that he is competent to correct everybody
    (C) Forewarns about possible difficulties
    (D) Demands high standards

13. Administration is concerned with ..................... .
    (A) Providing resources
    (B) Developing a set up
    (C) Defining functions
    (D) Executing stage

14. The focus of the behavioural theories of effective leadership is on :
    (A) What leaders do to adopt to the needs of the situation ?
    (B) What leaders do to help group accomplish their tasks ?
    (C) What are the personality traits of the leader ?
    (D) What style leaders adopt for communication with group ?

12. खालीलपैकी ................. हे सुधारणात्मक पर्यवेक्षणाचे वैशिष्ट नाही.
    (A) अधिकारवाणीने काम करणे
    (B) स्वत: मधे इतरांना दुरुस्त करण्याची क्षमता आहे, असा विश्वास बाळगतो
    (C) भविष्यातील संभाव्य अडचणीबाबत इशारा देतो
    (D) उच्च आदर्शाची मागणी करतो

13. प्रशासन हे ................ संबंधित आहे.
    (A) संसाधन पुरवठ्याशी
    (B) मांडणीचे विकसन करण्याशी
    (C) कार्याची व्याख्या करण्याशी
    (D) कार्यवाहीच्या टप्प्याशी

14. प्रभावी नेतृत्वाचा वर्तनवादी उप्पत्तीचा भर खालील बाबींवर आहे :
    (A) प्रासंगिक गरजांशी समायोजन साधण्यासाठी नेता काय करतो ?
    (B) समूहाच्या कार्यपूर्तीसाठी नेता कसे साहाय्य करतो ?
    (C) नेत्याच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये कोणती आहे ?
    (D) गटाबरोबर संप्रेषण साधण्यासाठी कोणती शैली स्वीकारतो ?

15. The advantages of PERT as follows :
    (1) Forces managers to plan
    (2) Concentrates attention on critical elements
    (3) Impracticable for routine planning
    (4) Emphasises on time only
    (A) 1 and 2
    (B) 3 and 4
    (C) 1 and 3
    (D) 2 and 4

16. ..................... is *not* a principle of evaluation.
    (A) Principle of overall development
    (B) Principle of planning of education process
    (C) Principle of objective-based teaching
    (D) Principle of understanding of benefits of evaluation tools

15. PERT तंत्राचे पुढील फायदे आहे :
    (1) व्यवस्थापकाला नियोजनासाठी भाग पाडले जाते
    (2) महत्त्वाच्या घटकांवर अवधान केंद्रीकरण
    (3) दैनंदिन नियोजनासाठी अव्यवहार्य
    (4) केवळ वेळेवर भर
    (A) 1 आणि 2
    (B) 3 आणि 4
    (C) 1 आणि 3
    (D) 2 आणि 4

16. मूल्यमापनाचे ............................ हे तत्त्व **नाही**.
    (A) सर्वांगीण विकासाचे तत्त्व
    (B) शिक्षण प्रक्रियेच्या नियोजनाचे तत्त्व
    (C) उद्दिष्टाधिष्ठित अध्यापनाचे तत्त्व
    (D) मूल्यमापन साधनांचे फायदे जाणण्याचे तत्त्व

17. A teacher in a school want to evaluate interest and scientific approach of the student, then he will use .................. evaluation technique.

(A) Examination

(B) Observational

(C) Self-report

(D) Projective

18. .................. is *not* a condition for standardised test.

(A) Content, area, size and structure of the test

(B) Testing procedure

(C) Evaluation procedure

(D) Goal and objectives of the test

17. एका शाळेतील शिक्षकाला विद्यार्थ्यांचे अभिरुची व वैज्ञानिक दृष्टिकोन याबाबतचे मूल्यमापन करावयाचे असल्यास, तो .................... या मूल्यमापन तंत्राचा वापर करेल.

(A) परीक्षा

(B) निरीक्षण

(C) आत्मनिरीक्षण

(D) अविष्कार

18. चाचणीच्या प्रमाणीकरणात .................... ही अट **नाही**.

(A) चाचणीचा आशय, आकार व रचना

(B) चाचणी देण्याची पद्धत

(C) चाचणीची मूल्यमापन पद्धत

(D) चाचणीचे ध्येय व उद्दिष्ट

19. In any test it is impossible to determine the realiability and validity without ................. .

(A) Objectivity

(B) Adequacy

(C) Utility

(D) Discrimination power

20. A teacher wants to compare the achieved abilities with the age and standard of his classroom students. Then .................. test will be useful for him.

(A) Criterion reference

(B) Norm reference

(C) Achievement

(D) Diagnostic

19. कोणत्याही चाचणीमध्ये .................... शिवाय विश्वसनीयता व सप्रमाणता निश्चित करणे शक्य नाही.

(A) वस्तुनिष्ठते

(B) पर्याप्तते

(C) उपयुक्तते

(D) भेदभाव-क्षमते

20. एका शिक्षकाला त्याच्या वर्गातील विद्यार्थ्यांची वय व इयत्तेनूसार मिळवलेल्या क्षमतांची तुलना करावयाची आहे. तर त्यास ................. चाचणी उपयुक्त ठरेल.

(A) निकष संदर्भ

(B) प्रमाणक संदर्भ

(C) प्राविण्य

(D) नैदानिक

21. As per Galbraith's view, educational technology is application of .............. .

(A) Teaching aids

(B) Theories related to teaching

(C) Theories related to learning

(D) Scientific knowledge of practical task

22. .................... is *not* the component of instructional system design.

(A) Aims and objectives

(B) Syllabus

(C) Teacher

(D) Tests and evaluation

23. Teacher uses teaching aids to explain the content. This happens in ................. stage of teaching.

(A) Pre-active

(B) Interactive

(C) Post-active

(D) Pro-active

21. गालब्रेथच्या दृष्टीने, शैक्षणिक तंत्रविज्ञान, हे ...................... उपयोजन आहे.

(A) शैक्षणिक साधनांचे

(B) अध्यापनविषयक उपपत्तींचे

(C) अध्ययनविषयक उपपत्तींचे

(D) प्रात्यक्षिक कामाच्या वैज्ञानिक ज्ञानाचे

22. .................... हा अनुदेशन प्रणालीचा घटक **नाही**.

(A) ध्येये व उद्दिष्टे

(B) पाठ्यक्रम

(C) शिक्षक

(D) चाचण्या व मूल्यमापन

23. शिक्षक पाठ्यांश स्पष्ट करण्यासाठी शैक्षणिक साधनांचा वापर करतात, हे अध्यापनाच्या ................... घडते.

(A) पूर्वावस्थेत

(B) आंतरक्रियात्मक

(C) उत्तरावस्थेत

(D) स्वयं प्रेरित अवस्थेत

24. The following is the example of ................... type of programming.

| | |
|---|---|
| | $4^2$, Here 4 is base and 2 is indices |
| Base<br>Indices | $3^4$, Here 3 is base and 4 is indices.<br>Then $5^2$, 5 is ......., 2 is .......... |

(A) Linear

(B) Branching

(C) Rule-eg

(D) Eg-rule

25. To see the position of particular student in the class or group is the purpose of .................... .

(A) Norm-referenced tests

(B) Criterion-referenced test

(C) Achievement tests

(D) Diagnostic tests

24. खालील उदाहरण .................. प्रकारच्या अभिक्रमाचे आहे.

| | |
|---|---|
| | $4^2$, येथे 4 हा पाया व 2 हा घातांक आहे |
| पाया<br>घातांक | $3^4$, येथे 3 हा पाया व 4 हा घातांक आहे<br>म्हणून $5^2$ येथे 5 ........ आहे व 2 .......... आहे. |

(A) रेखीय

(B) शाखीय

(C) रूल-एग्

(D) एग्-रूल

25. एखाद्या विद्यार्थ्याचे वर्गातील किंवा गटातील स्थान पाहणे हा ................ असतो.

(A) प्रमाणक-संदर्भीय कसोटीचा

(B) निकष-संदर्भीय कसोटीचा

(C) संपादन कसोटीचा

(D) नैदानिक कसोटीचा

26. The behaviour asking questions continuously is primararily seen in ..................... students.

(A) Mentally retarded

(B) Visually impaired

(C) Gifted

(D) Learning disabled

27. Problem in reading is an symptom of ...................... problem.

(A) Physically handicapped

(B) Hearing impairement

(C) Visual impairement

(D) Learning disabled

28. Acceleration of gifted students in achievable due to .................. .

(A) Project and activity based home-work

(B) Ability grouping

(C) Advanced curriculum

(D) Special guidance sessions

26. 'सतत प्रश्न विचारणे' हे वर्तन प्रामुख्याने ..................... या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येते.

(A) मतिमंद

(B) दृष्टिदोष असणारे

(C) प्रतिभावंत

(D) अध्ययन अकार्यक्षम

27. वाचनामध्ये दोष असणे, हे लक्षण ............. या दोषाचे आहे.

(A) शारीरिक विकलांग

(B) श्रवणदोष

(C) दृष्टिदोष

(D) अध्ययन अकार्यक्षम

28. प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचे गतिवर्धन .................. मुळे साध्य होते.

(A) प्रकल्प आणि कृतीयुक्त गृहपाठ

(B) क्षमतेनुसार गट

(C) जादा अभ्यासक्रम

(D) विशेष मार्गदर्शन वर्ग

29. Sandeep unnecessarily speaks very fast. The reason is that he has .................... problem.

(A) Hearing

(B) Speaking

(C) Learning disability

(D) Mental retardedness

30. Sneha wanders aimlessly in the classroom. Sneha may be ............. .

(A) Learning disabled

(B) Mentally retarded

(C) Hyperactive

(D) Inattentive

31. As per NCTE Regulation, 2014, there should be ................ number of full-time teachers to conduct one unit of 50 students in B.Ed. course.

(A) 1 + 6

(B) 1 + 7

(C) 1 + 1 + 6

(D) 1 + 8

29. संदीप बोलताना अकारण घाई करतो. याचे कारण त्याच्यामध्ये .................. हा दोष आहे.

(A) श्रवण

(B) वाचा

(C) अध्ययन अकार्यक्षम

(D) मतिमंदत्त्व

30. स्नेहा वर्गामध्ये विनाकारण इकडेतिकडे फिरत असते. स्नेहा कदाचित .................. असेल.

(A) अध्ययन अकार्यक्षम

(B) मतिमंद

(C) अतिचंचल

(D) अनावधानी

31. एन.सी.टी.ई. अधिनियम 2014, नुसार बी. एड. अभ्यासक्रमाचा 50 विद्यार्थी संख्येचा एक वर्ग चालविण्यासाठी ...................... पूर्णवेळ प्राध्यापकांची आवश्यकता आहे.

(A) 1 + 6

(B) 1 + 7

(C) 1 + 1 + 6

(D) 1 + 8

32. The following candidate is eligible for seeking admission to M.A. Education (distance education) course of the YCMOU ................ .

(A) He should have studied the subject education for at least three years at degree course

(B) He should have studied the subject education at least for two years at degree course

(C) He should have studied the subject education for at least one year at degree course

(D) He should have passed D.Ed.

32. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एम. ए. (शिक्षणशास्त्र) अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी पुढील किमान पात्रता आवश्यक आहे.

(A) उमेदवाराने पदवीस्तरावर शिक्षणशास्त्र विषयाचा अभ्यास किमान तीन वर्षे केलेला असला पाहिजे

(B) उमेदवाराने पदवीस्तरावर शिक्षणशास्त्र विषयाचा अभ्यास किमान दोन वर्षे केलेला असला पाहिजे

(C) उमेदवाराने पदवीस्तरावर शिक्षणशास्त्र विषयाचा अभ्यास किमान एक वर्ष केलेला असला पाहिजे

(D) उमेदवार डी.एड. (पदवीका) परीक्षा उत्तीर्ण असला पाहिजे

33. 'B.Ed. course should be of two years duration' was the recommendation of .................... commission.

(A) Ram Murti

(B) Kothari

(C) Mudaliar

(D) Radhakrishnan

34. Main function of teacher organization is to ................. .

(A) Unite teachers

(B) Provide forum for sharing of experiences

(C) Bring about professional growth

(D) Make policy for future

35. One of the measures of teaching effectiveness is .................. .

(A) Teacher's character

(B) Students' reaction towards teacher

(C) Classroom management

(D) Students' discipline

33. 'बी.एड. अभ्यासक्रम हा दोन वर्ष मुदतीचा असला पाहिजे' ही शिफारस .................. आयोगाने केली होती.

(A) राम मूर्ती

(B) कोठारी

(C) मुदालिआर

(D) राधाकृष्णन

34. शिक्षक संघटनांचे मुख्य कार्य .................... हे असते.

(A) शिक्षकांना संघटित करणे

(B) अनुभवांची देवाण-घेवाण करणे

(C) व्यावसायिक विकास साधणे

(D) भविष्यासाठी योजना आखणे

35. अध्यापनाच्या परिणामकारकतेचे .................. हे एक परिणाम आहे.

(A) शिक्षकाचे चारित्र्य

(B) विद्यार्थ्यांच्या शिक्षकाप्रती प्रतिक्रिया

(C) वर्ग अवस्थापन

(D) विद्यार्थ्यांची शिस्त

36. Existentialism is about ................ .

(A) The relationship between human being and nature

(B) Nature and human sorrow

(C) Human nature

(D) The human being and his existence

36. अस्तित्ववाद या बाबतीत असतो ................ .

(A) मानव आणि निसर्ग यांचातील अंतर्संबंध

(B) निसर्ग आणि मानवी दु:ख

(C) मानवी स्वभाव

(D) मानव आणि त्याचे अस्तित्व

37. Pluralistic philosophy of life is also known as ..................... .

(A) Idealism

(B) Naturalism

(C) Spiritualism

(D) Pragmatism

37. जीवनाच्या अनेकत्ववादी तत्त्वज्ञानाला ........... असे ही ओळखले जाते.

(A) आदर्शवाद

(B) निसर्गवाद

(C) अध्यात्मवाद

(D) कार्यवाद

38. 'Self-realization is the aim of education.' This thought is propounded by ..................... .

(A) Idealism

(B) Realism

(C) Spiritualism

(D) Pragmatism

38. 'आत्मसाक्षात्कार हे शिक्षणाचे ध्येय होय.' याचा पुरस्कार ..................... ने केला आहे.

(A) आदर्शवाद

(B) वास्तववाद

(C) अध्यात्मवाद

(D) कार्यवाद

39. "One of the aims of education is to help attain Nirwan" is according to ................... philosophy.

(A) Jainism

(B) Buddhism

(C) Vedant

(D) Upanishad

39. ............... तत्वज्ञानानुसार शिक्षणाच्या ध्येयांपैकी निर्वाण प्राप्ती हे एक ध्येय आहे.

(A) जैन

(B) बौद्ध

(C) वेदांत

(D) उपनिषद

40. The Vedant School of Philosophy in India encourages the method of .................. .

(A) Verification

(B) Experimentation

(C) Questioning

(D) Trust

40. भारतीय तत्त्वज्ञानाची वेदान्त शाखा ............ पद्धतीचा पुरस्कार आहे.

(A) पडताळा घेणे

(B) प्रयोग करणे

(C) प्रश्न विचारणे

(D) विश्वास ठेवणे

41. Which of the following is *not* the democratic procedure of teaching ?

(A) Demonstration

(B) Work-shop

(C) Debate

(D) Seminar

41. खालीलपैकी कोणती लोकशाही प्रधान पद्धती **नाही** ?

(A) दिग्दर्शन

(B) कृतिसत्र

(C) परिसंवाद

(D) चर्चासत्र

42. Which of the following is mainly culturally decided ?

(A) Social equity

(B) Social stratification

(C) Economic disadvantage

(D) Social mobility

43. According to Brown, 'Institutions are patterns of behaviour that have clustered around ................. .

(A) Infrastructure and human resources

(B) Two or more members

(C) A specific need or desire

(D) Human relationships

44. Modernisation in its true sense is ..................... .

(A) Development of science and scientific attitude

(B) Enjoyment of more comfort in life

(C) Adopting western culture

(D) Changing the way of life

42. पुढीलपैकी कोणत्या बाबीचे निर्धारण प्रामुख्याने संस्कृतीद्वारे केले जाते ?

(A) सामाजिक साम्य

(B) सामाजिक स्तरीकरण

(C) आर्थिक वंचितता

(D) सामाजिक गतिशीलता

43. ब्राऊन यांच्या मते संस्था या ...................... भोवती एकत्रित झालेल्या वर्तनाचे आकृतिबंध होत.

(A) भौतिक सुविधा व मानवी संसाधन

(B) एक किंवा अधिक सभासद

(C) एक विशिष्ट गरज अथवा इच्छा

(D) मानवी आंतरसंबंध

44. आधुनिकीकरणाचा खरा-अर्थ ................ हे आहे.

(A) विज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टीकोणाचा विकास

(B) जीवनात अधिक आनंद उपभोगणे

(C) पाश्चात्य संस्कृती स्वीकारणे

(D) जीवनाचा मार्ग बदलणे

45. According to Talcot Parson, social change deals with ..................... .

(A) Spiritual upliftment

(B) Economic upliftment

(C) Cultural revolution

(D) Functional needs of the society

46. According to Piaget's developmental theory, in ...................... stage a child can understand other peoples point of view.

(A) Sensori-motor

(B) Pre-operational

(C) Concrete-operational

(D) Formal operational

47. According to Kohlberg's theory of moral development 'saying a good boy/girl' is a feature of ................. level.

(A) Pre-conventional

(B) Conventional

(C) Post-conventional

(D) Concrete

45. टालकोट पारसननुसार सामाजिक परिवर्तनाचा संबंध .................... आहे.

(A) आध्यात्मिक उत्थानाशी

(B) आर्थिक उत्थानाशी

(C) सांस्कृतिक क्रांतीशी

(D) समाजाच्या कार्यात्मक गरजांशी

46. पियाजेच्या बोधात्मक विकास उपपत्तीनुसार मुल ...................... या अवस्थेत लोकांचे दृष्टिकोन समजून घेते.

(A) संवेदनकारक

(B) क्रियापूर्व

(C) मूर्त क्रियात्मक

(D) अमूर्त क्रियात्मक

47. कोहलबर्गच्या नैतिक विकास उपपत्तीनुसार, 'हा चांगला मुलगा/मुलगी' हे ................. पातळीचे वैशिष्ट्य आहे.

(A) पूर्व सांकेतिक

(B) सांकेतिक

(C) सांकेतिकोतर

(D) मूर्त

48. According to Graham Valas proper sequence of creative process is ......................... .

(A) Incubation—preparation—illumination—verification

(B) Preparation—illumination—incubation—verification

(C) Preparation—incubation—illumination—verification

(D) Preparation—incubation—verification—illumination

48. ग्रॅहम वालास यांच्या सर्जनशील प्रक्रियेच्या पायऱ्यांचा क्रम .................... असा आहे.

(A) उबविणे—पूर्वतयारी—प्रकाशिकीकरण—पडताळा

(B) पूर्वतयारी—प्रकाशिकीकरण—उबविणे—पडताळा

(C) पूर्वतयारी—उबविणे—प्रकाशिकीकरण—पडताळा

(D) पूर्वतयारी—उबविणे—पडताळा— प्रकाशिकी-करण

49. .................... is *not* a important tool of thinking.

(A) Concept

(B) Image

(C) Symbols and signs

(D) Memory

49. .................... हे विचारप्रक्रियेचे महत्त्वाचे साधन **नाही.**

(A) संबोध

(B) प्रतिमा

(C) चिन्हे आणि खुणा

(D) स्मरण

50. Which of the following is transmitted due to environment in the child ?

(A) Colour of hair

(B) Height and complexion

(C) Intelligence

(D) Interest and values

50. परिस्थितीमुळे मुलांमध्ये खालीलपैकी कोणत्या गोष्टी संक्रमित होतात ?

(A) केसांचा रंग

(B) उंची आणि वर्ण

(C) बुद्धिमत्ता

(D) अभिरुची व मूल्ये

51. In measuring the intelligence of those who have language, culture and physical limitations, ................ tests are more useful.

(A) Performance

(B) Verbal

(C) Group

(D) Individual

52. In the nature of learning process .................. component is not present.

(A) Motivation

(B) Aptitude

(C) Revision

(D) Insight

53. Anita minimizes her wrong habits. So she used ..................... law of conditioning process stated by Pavlov.

(A) Reinforcement

(B) Stimulus generalization

(C) Extinction of stimulus

(D) Differentiation of stimulus

51. भाषिक, सांस्कृतिक आणि शारीरिक मर्यादा असणाऱ्या व्यक्तींचे बुद्धिमापन करण्यासाठी ................ चाचण्या जास्त उपयुक्त असतात.

(A) कृती

(B) शाब्दिक

(C) समूह

(D) व्यक्तिगत

52. अध्ययनप्रक्रियेच्या स्वरूपामध्ये ..................... हा घटक नसतो.

(A) प्रेरण

(B) अभियोग्यता

(C) आवर्तन

(D) मर्मदर्शन

53. अनिता स्वतःच्या चुकीच्या सवयी कमी करते. म्हणून ती पॉव्हलॉव्ह यांनी सांगितलेल्या अभिसंधान प्रक्रियेचा ................. नियम वापरते.

(A) दृढीकरण

(B) उद्दीपक सामान्यीकरण

(C) उद्दीपक विलोपन

(D) उद्दीपक वियोजन

54. In the learning theory of Thorndike, Pavlov and Skinner for learning, they didn't accept need of ............... component.

(A) Motivation

(B) Intelligence

(C) Behaviour

(D) Adjustment

55. Teacher should correlate grammar of Marathi and Hindi. This statement is related to ................ theory of transfer of learning.

(A) Thorndike's

(B) Judd's

(C) Bagley's

(D) John Locke's

56. ..................... gave more specification to trait and type approach while explaining the theory of personality.

(A) Allport

(B) Eysenck

(C) Cattell

(D) Erickson

54. थॉर्नडाईक, पॉव्हलॉव्ह व स्किनर यांच्या अध्ययन उपपत्तीमध्ये अध्ययन होण्यासाठी ............... या घटकाची गरज नाही हे मान्य केले आहे.

(A) प्रेरणा

(B) बुद्धिमत्ता

(C) वर्तन

(D) समायोजन

55. शिक्षकाने मराठी व्याकरण आणि हिंदी व्याकरणाचा संबंध जोडला पाहिजे. हे विधान अध्ययनसंक्रमणाच्या ............... च्या उपपत्तीशी संबंधित आहे.

(A) थॉर्नडाईक

(B) जड्ड

(C) बॅग्ले

(D) जॉन लॉक

56. व्यक्तिमत्त्व उपपत्तीच्या स्पष्टीकरणासाठी ................ ने गुणतत्त्व व वर्गतत्त्वाचे अधिक विशेषीकरण केले.

(A) ऑलपोर्ट

(B) आयसेन्क

(C) कॅटेल

(D) एरिकसन्स

57. ................. is a characteristic of well adjusted person.

(A) Withdrawal from situation

(B) A realistic perception of the world

(C) External aggression

(D) Internal aggression

57. सुसमायोजित व्यक्तीचे ................ हे वैशिष्ट्य आहे.

(A) परिस्थितीपासून पलायन

(B) विश्वाचा वास्तववादी अवबोध

(C) बाह्य आक्रमकता

(D) आंतरिक आक्रमकता

58. ..................... is *not* a characteristic of projective technique in personality measurement.

(A) Holistic approach

(B) Freedom to response

(C) Verbal response

(D) Ambiguous material

58. व्यक्तिमत्त्व मापनात प्रक्षेपण तंत्राचे ............ हे वैशिष्ट्य **नाही**.

(A) समग्र उपागम

(B) मुक्त प्रतिसाद

(C) शाब्दिक प्रतिसाद

(D) संदिग्ध साहित्य

59. In the definition of mental hygiene, ................... focuses on human welfare and pervades all fields of human relationship.

(A) D. B. Klein

(B) Gates

(C) Drever

(D) Crow and Crow

59. मानसिक स्वास्थ्याच्या व्याख्येत ............... यांनी मानवी कल्याण आणि विविध क्षेत्रातील मानवी संबंध व्यापणे यावर भर दिला आहे.

(A) डी. बी. क्लेन

(B) गेट्स

(C) ड्रीव्हर

(D) क्रो आणि क्रो

60. .................. is *not* a main aspect of adjustment.

(A) Health adjustment

(B) Emotional adjustment

(C) Mental adjustment

(D) Social adjustment

61. 'Rating is in essence directed observation. This definition is given by ..................... .

(A) Gibson R. L.

(B) Barr A. S. and Others

(C) Bonny and Hampleman

(D) Ruth Strang

62. Sandip decided to leave the school due to various problems at home. The counseller clearly declined this action. The counselling technique used here is ................... .

(A) Advice

(B) Acceptance

(C) Restatement

(D) Rejection

60. ........................ हे समायोजनाचे प्रमुख अंग **नाही.**

(A) आरोग्य समायोजन

(B) भावनिक समायोजन

(C) मानसिक समायोजन

(D) सामाजिक समायोजन

61. 'पदनिश्चयन हे मूळत: निर्देशित निरीक्षण होय.' ही व्याख्या ..................... यांची आहे.

(A) गिब्सन् आर. एल.

(B) बार ए. एस. आणि इतर

(C) बोनी व हॅम्पलमन

(D) रूथ स्ट्रॅन्ग

62. घरच्या समस्यांना कंटाळून संदीपने शाळा सोडण्याचा निर्णय घेतला असता समुपदेशकाने त्याला या कृतीसाठी स्पष्ट नाही म्हटले, हे उदाहरण समुपदेशनाच्या खालील तंत्रापैकी .................. ह्या तंत्राचे आहे.

(A) सल्ला

(B) स्वीकार

(C) पुनरुच्चारण

(D) नापसंती

63. The 'client centered' theory is proposed by .................. .

(A) Ivan Pavlov

(B) Skinner

(C) Carl Rogers

(D) Sigmond Froed

64. Intelligence is the ability to do 'Abstract thinking'. This is stated by .................. .

(A) Stern

(B) Terman

(C) Thorndike

(D) Kolvin

65. 'To help in the improvement of mental health of students is an objective of .................... area of guidance.

(A) Social

(B) Educational

(C) Moral

(D) Personal

63. समुपदेश्य केंद्रित उपपत्तीचे जनक ............. होय.

(A) इव्हान पॉव्हलॉव्ह

(B) स्किनर

(C) कार्ल रॉजर्स

(D) सिग्मंड फ्रॉइड

64. अमूर्तात विचार करण्याची क्षमता म्हणजे बुद्धी असे .................... यांचे मत आहे.

(A) स्टर्न

(B) टर्मन

(C) थॉर्नडाईक

(D) कोल्विन

65. विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी सहकार्य करणे हे उद्दिष्ट मार्गदर्शनाच्या ................... या क्षेत्रातील आहे.

(A) सामाजिक

(B) शैक्षणिक

(C) नैतिक

(D) वैयक्तिक

66. Which one of the following is *not* a part of non-sampling error ?

(A) Wrong sample unit selection

(B) Non-response from sample unit

(C) Poor questions in data collection tool

(D) Coding and editing problem while computing

67. When each participant has an equal and independent chance of being selected to participate in the study, the sample design is .................. .

(A) Simple random sampling

(B) Quota sampling

(C) Purposeful sampling

(D) Snowball sampling

68. In the case of .................... random sampling, a two stage sampling procedure is used when the population is spread out geographically or there is no single overall list in the accessible population.

(A) Simple

(B) Systematic

(C) Stratified

(D) Cluster

66. खालीलपैकी कोणते एक अ-नमुनाकरण (non-sampling) त्रुटीचा भाग **नाही** ?

(A) चुकीच्या नमुना-एककाची निवड

(B) नमुना एककांचे प्रतिसाद न देणे

(C) माहिती संकलन साधनातील कमी दर्जाचे प्रश्न

(D) गणनातील सांकेतिकीकरण आणि संपादन यामधील समस्या

67. जेव्हा प्रत्येक सहभागी घटकाचा अभ्यासामधे सहभागी होण्यासाठी निवडले जाण्याची समान आणि स्वतंत्र संधी असते, अशा नमुना आराखड्यास .................... असे म्हणतात.

(A) सुगम यादृच्छिक नमुना निवड

(B) निर्दिष्टांश नमुना निवड

(C) सहेतूक नमुना निवड

(D) स्नोबॉल नमुना निवड

68. जेव्हा जनसंख्या भौगोलिकदृष्ट्या पसरलेली असते किंवा विचारात घ्यावयाच्या जनसंख्येची एकत्रितपणे केलेली एक यादी नसते तेव्हा ............... या यादृच्छिक नमुनानिवडीमध्ये द्विस्तरीय नमुनानिवड पद्धती वापरली जाते.

(A) सुगम

(B) नियमबद्ध

(C) स्तरीकृत

(D) गुच्छ

69. When students of a school volunteer to participate in a research project, the sample design is :

(A) Systematic random rampling design

(B) Probability sampling design

(C) Non-probability sampling design

(D) Cluster sampling design

70. To draw a sample from a population, stratification is used when the population ................... .

(A) reflects an imbalance on a characteristic of a sample

(B) reflects balance on a characteristic of the sample

(C) has equal number of males and females in a sample

(D) has equal number of children and adults in a sample

69. जेव्हा एका शाळेतील विद्यार्थी एका संशोधन प्रकल्पात स्वत:हुन सहभागी झाले, हा नमुना आराखडा ................ होय.

(A) नियमबद्ध यादृच्छिक नमुना निवड आराखडा

(B) संभाव्यता आधारित नमुना निवड आराखडा

(C) अ-संभाव्यता आधारित नमुना निवड आराखडा

(D) गुच्छ नमुना निवड आराखडा

70. जनसंख्येतून नमुना निवडताना स्तरीकरण वापरले जाते जेव्हा जनसंख्या ................ .

(A) नमुन्याच्या वैशिष्ट्यांची असंतुलितता प्रतिबिंबित करते

(B) नमुन्याच्या वैशिष्ट्यांची संतुलितता प्रतिबिंबित करते

(C) म्हणजे पुरुष व स्त्रियांचे नमुने समान असतात

(D) म्हणजे मुले व प्रौढांचे नमुने समान असतात

71. The ..................... is the product of direct observation in research.

(A) Self-report measure

(B) Archival measure

(C) Researcher-observed measure

(D) Measure of record of tests and documents

72. Find out the *correct* sequence of the following four terms starting from broader to specific one :

Terms : V :Variable

T : Theories

H : Hypothesis

G : Generalizations

(A) G → T → H → V

(B) T → V → H → G

(C) T → G → H → V

(D) T → G → V → H

71. संशोधनातील प्रत्यक्ष निरीक्षणाचे फलित ................. होय.

(A) स्वयं-अहवाल मापन

(B) संग्रहित बाबींचे मापन

(C) संशोधन निरीक्षीत मापन

(D) कसोट्या आणि दस्तएवज यांच्या नोंदीचे मापन

72. खाली दिलेल्या चार संज्ञाचा व्यापक ते विशिष्ट अशा क्रमाने योग्य क्रम शोधा :

संज्ञा : V : चले

T : सिद्धांत

H : परिकल्पना

G : सामान्यीकरण

(A) G → T → H → V

(B) T → V → H → G

(C) T → G → H → V

(D) T → G → V → H

73. When all participants are assigned to the experimental group and its effectiveness tested after treatment it is called .................... .

(A) Two group post-test only design

(B) Two group pre-test-post test design

(C) One-group post-test only design

(D) One-group pre-test-post test design

74. The tools/techniques prominently used in Ethnographical studies to collect data are :

(A) Interview and rating scale

(B) Interview and observation

(C) Observation and questionnaire

(D) Questionnaire and interview

75. Frequency polygons and histograms can be the best choice to use if the data is .................. .

(A) Nominal

(B) Ordinal

(C) Normal

(D) Dichotomous

73. जेव्हा सर्व सहभागींना प्रायोगिक गट म्हटले आणि उपचारमात्रा दिल्यानंतर त्यांची परिणामकारकता तपासली, त्याला .................. असे म्हणतात.

(A) द्वि-गट केवळ उत्तर आराखडा

(B) द्वि-गट, पूर्व कसोटी-उत्तर कसोटी आराखडा

(C) एकल गट, केवळ उत्तर कसोटी आराखडा

(D) एकल गट, पूर्व कसोटी—उत्तर कसोटी आराखडा

74. संस्कृतिवर्णन अभ्यासात माहिती संकलनासाठी प्रामुख्याने वापरली जाणारी साधने/तंत्रे .......... हे होत.

(A) मुलाखत आणि पद-निश्‍चन श्रेणी

(B) मुलाखत आणि निरीक्षण

(C) निरीक्षण आणि प्रश्नावली

(D) प्रश्नावली आणि मुलाखत

75. जेव्हा माहिती (data) .................. असेल तेव्हा वारंवारिता बहुभूज आणि आयतालेख हे उत्कृष्ट निवड असू शकतात.

(A) नामांकन शलाकेवर मोजली जाणारी

(B) क्रमांकन शलाकेवर मोजली जाणारी

(C) प्रसामान्य

(D) दोन भागात विभागली जाणारी

**ROUGH WORK**